

आगोंद समुद्रकिनारी पाच आस्थापनांचे टाळे उघडले पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



जोकोविचने फेडररचा विक्रम मोडला पान ४ वर

वेर्णा, शनिवार, २९ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 205 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 29 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# मडगावमध्ये करवाढीविरोधात आंदोलन

## व्यापारी, घरमालक आणि नागरिकांचा तीव्र संताप

■ टीम दैनिक हेराल्ड




**मडगाव, दि. २८ : प्रस्तावित कर आणि शुल्क वाढीविरोधात मडगाव पालिकेच्या (एमएमसी) इमारतीबाहेर नागरिकांनी मोठ्या संख्येने एकत्र येत तीव्र निदर्शने केली. या आंदोलनात काँग्रेस नेते ऑरव्हिल रॉड्रिग्ज, राजन घाटे, मोरेनो रिबेलो, मिलाग्रिस फर्नांडिस तसेच गोवा फॉरवर्ड पक्षाचे नेते दिलीप प्रभुदेसाई, मोहनदास लोलयेकर, डॉ. बबिता अँगल, एमएमसी नगरसेवक, व्यापारी, घरमालक आणि इतर प्रमुख नागरिकांनी सहभाग घेतला.**

भाजपच्या नेतृत्वाखालील नगरपरिषद आणि मडगावचे आमदार दिगंबर कामत यांच्यावर टीका करताना सावियो कुतिन्हो यांनी व्यापारी आणि घरमालकांवरील वाढत्या आर्थिक ओझ्याकडे लक्ष वेधले. त्यांनी नगरपरिषदेच्या कामकाजातील विसंगती दर्शवत मडगाव पालिकेचे अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि प्रशासनाच्या अकार्यक्षमतेवर जोरदार टीका केली.

कुतिन्हो यांनी नगरसेवक आणि आमदारांना कोट्यवधी रुपयांच्या थकबाकीबाबत जाब विचारला. यात कर्मचाऱ्यांनी गैरव्यवहार केलेले १८ लाख रुपये आणि सोपो कंत्राटदाराकडून ६५ लाखांहून अधिक थकबाकी यांचा समावेश होता. त्यांनी मोबाईल टॉवर ऑपरेटर आणि पेट्रोल पंपांकडून वसूल न झालेल्या कर व भाड्याबाबतही प्रशासनाच्या दुर्लक्षावर बोट ठेवले.

गोवा फॉरवर्ड पक्षाचे नेते मोहनदास लोलयेकर यांनी भाजपच्या ट्रिपल-इंजीन प्रशासनावर टीका करत मडगाव, फातोर्डा आणि कुडतरी येथील नागरिकांवर अन्याय केल्याचा आरोप केला. त्यांनी दिगंबर कामत यांनी १ एप्रिलपासून प्रस्तावित केलेल्या करवाढीला तीव्र विरोध दर्शवला.

नगरसेवकांनी भाडेवाढीच्या ठरावाला विरोध न केल्याबद्दल विचारले असता, लोलयेकर यांनी नगरसेवकांना दिशाभूल करून ही वाढ केवळ २० टक्के असल्याचे भासवण्यात आल्याचे स्पष्ट केले. मात्र, गोवा फॉरवर्डचे नगरसेवक यापुढेही या भाडेवाढीला विरोध करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी सत्ताधारी नगरसेवक आणि आमदारांना इशारा दिला की, जर ही भाडेवाढ मागे घेतली नाही, तर आगामी महानगरपालिका आणि विधानसभा निवडणुकीत नागरिक आपला निर्णय देतील.

अँड्र्यू परेरा यांनी एमएमसी अध्यक्षांवर आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप करत ५०,०००

पान २ ▶

### ‘मडगावकरांचो आवाज’ कडून निवेदन सादर

व्यापार परवाने, बांधकाम परवाने, स्वच्छता शुल्क आणि इतर महानगरपालिका शुल्कांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यात आल्याच्या निषेधार्थ मडगाव नगरपरिषदेच्या (एमएमसी) विरोधात मडगावकरांचो आवाज या संघटनेकडून देखील निवेदन करण्यात आले आहे. संघटनेने मडगाव नगरपरिषदेकडून मागील चार वर्षांत पुरविल्या गेलेल्या सेवा आणि नगरसेवक व महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेचे मूल्यांकन करणारी श्वेतपत्रिका जाहीर करण्याची मागणी केली आहे. नगरपरिषदेच्या विविध सेवांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, वैज्ञानिक कचरा व्यवस्थापन, स्वच्छ शौचालये आणि कपडे बदलण्याच्या खोल्यांची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याचे कियोस्क, बाजारपेठांची देखभाल आणि सुरक्षितता, वाहतूक बेटे आणि सार्वजनिक ठिकाणांची निगा राखण्यासंदर्भात महत्त्वाच्या सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली आहे.

**“ ही करवाढ जास्तीत जास्त २० टक्के असल्याचे नगराध्यक्ष सांगत आहेत. मात्र मडगाव नगरपरिषदेकडून सुधारित करवाढीसंदर्भात जे जाहीर पत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे, त्यात एकाही बाबतीत २० टक्के करवाढ नसून प्रत्येक बाबतीत ती अधिक आहे. कमीतकमी करवाढ ६६ टक्के आहे आणि जास्तीत जास्त ५०० टक्के देखील करवाढ आकारण्यात आली आहे. नागरिकांचा या वारेमाप करवाढीला तीव्र विरोध आहे . ही करवाढ मागे घेतली नाही तर आम्ही आमचा लढा अधिक तीव्र करू.**

**– सावियो कुतिन्हो,** माजी नगराध्यक्ष.




## निवडक

### केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ

**नवी दिल्ली, दि. २८ :** नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी केंद्र सरकारने केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना खुशखबर दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने शुक्रवारी केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ करण्यास मंजुरी दिली. या निर्णयामुळे महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५५ टक्क्यांपर्यंत जाईल. यामुळे आठव्या वेतन आयोगापूर्वी कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होईल. याआधी जुलै २०२४ मध्ये डीए ५० टक्क्यांवरून ५३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला होता. केंद्रीय मंत्रिमंडळाने महागाई भत्त्यात वाढ केल्याने त्याचा फायदा ६८ लाखांहून अधिक कर्मचारी आणि सुमारे ४२ लाख पेन्शनधारकांना होईल. महागाई भत्ता (डीए) हा सरकारी कर्मचाऱ्यांना महागाईपासून दिलासा देणारा आणि त्यांचे वेतन राहणीमानाच्या वाढत्या खर्चाशी सुसंगत राहावे, यासाठी दिला जाणारा आर्थिक लाभ समजला जातो. केंद्र सरकारकडून दरवर्षी होळी आणि दिवाळी सणांपूर्वी दर दोन वर्षांनी महागाई भत्त्यात वाढीची घोषणा केली जाते. पण यावेळी होळीच्या सणाआधी याबाबत काही घोषणा करण्यात आली नव्हती.

-----------

### कठुआमध्ये चकमक; ३ दहशतवादी ठार

जम्मू, दि. २८ : जम्मू आणि काश्मीरच्या कठुआ येथील सुफेन जंगल भागात सुरक्षा दल आणि दहशतवादी यांच्यात शुक्रवारी सलग दुसऱ्या दिवशी चकमक कायम राहिली. गुरुवारी झालेल्या चकमकीत ३ पोलिस शहीद झाले. तर या कारवाईदरम्यान तीन दहशतवाद्यांना ठार करण्यात आले. पोलिस उपअधीक्षक धीरज कटोच आणि इतर दोन पोलिस तसेच १ पॅरा स्पेशल फोर्सेसचा एक लष्करी जवान जखमी झाला. या परिसराची सुरक्षा दलांनी घेराबंदी केली असून, अतिरिक्त सुरक्षा जवान तैनात करण्यात आले आहे. कठुआ येथे सुरू असलेल्या दहशतवादविरोधी ऑपरेशनदरम्यान ’सफियान’ गावाजवळ जम्मू आणि काश्मीर दलातील काही पोलिस शहीद झाल्याची पुष्टी भारतीय लष्कराच्या ’रायझिंग स्टार कॉर्प्स’ने ’एक्स’ वरील पोस्टमधून केली आहे.

-----------

### केजरीवालविरोधात गुन्हा दाखल

**नवी दिल्ली, दि. २८ :** दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याविरुद्ध दिल्ली पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. सरकारी पैशाच्या गैरवापराच्या प्रकरणात सार्वजनिक मालमत्ता कायद्यांतर्गत हा एफआयआर नोंदवण्यात आला आहे. केजरीवाल यांच्यावर प्रसिद्धीसाठी मोठे होर्डिंग्ज लावण्यासाठी सार्वजनिक पैशाचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ एप्रिल रोजी निश्चित केली आहे. केजरीवाल आणि इतर दोन नेत्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर राऊस अव्हेन्यू कोर्टात शुक्रवारी सुनावणीदरम्यान दिल्ली पोलिसांनी ही माहिती दिली. यापूर्वी ११ मार्च रोजी राऊस अव्हेन्यू न्यायालयाने सरकारी पैशाच्या गैरवापराच्या प्रकरणात अरविंद केजरीवाल यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाने १८ मार्चपर्यंत पोलिसांकडून या प्रकरणाचा स्टेटस रिपोर्ट मागितला होता.

### हवामान

कमाल : ३६ किमान : २६
आर्द्रता : ६३

### बाजार भाव

सोने : ₹ ९०,३०० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,००,१०० (१किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७२,३६५ .७७ ↑ (३१.१६ )
निफ्टी : २२,२३५.९० ↑ (८३.९५)

# आंतरराष्ट्रीय सायबर गुन्ह्याचा पर्दाफाश; तिघांना अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २८ :** कझाकस्तानचा नागरिक तलानीती नुलाक्सीविरुद्ध तातडीने लूकआउट सर्क्युलर जारी करणे हे त्याच्या पलायनास प्रतिबंध करण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय सायबर गुलामगिरी सिंडिकेटचा पर्दाफाश करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले, अशी माहिती पोलिस महासंचालक आलोक कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

परदेशातील बनावट नोकऱ्यांच्या ऑफरद्वारे तरुणांची फसवणूक करून त्यांना सायबर गुन्ह्यात ओढल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या तिघांमध्ये चिनी वंशाच्या नुलाक्सीचाही समावेश आहे. हनीट्रॅप आणि खंडणी योजनांशी संबंधित घरून काम करण्याच्या फसवणुकीसाठी महिलांची भरती

**▶ सायबर गुलामगिरीचा धक्कादायक प्रकार! गोव्यातील युवकाची सुटका**

करण्याचा या सिंडिकेटचा कट असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

लूकआउट सर्क्युलर तातडीने जारी केल्यामुळे नुलाक्सीला देशाबाहेर पळण्यास अडथळा निर्माण झाला. जर विलंब झाला असता, तर त्याचा शोध घेणे आणि भारतात परत आणणे अधिक कठीण झाले असते, असे कुमार यांनी स्पष्ट केले. गोव्यातील एका युवकाची म्यानमारमधील बेकायदेशीर सायबर गुन्हेगारी केंद्रातून सुटका झाल्यानंतर या प्रकरणाला गती मिळाली. पीडिताच्या जबाबाच्या आधारे गोवा पोलिसांनी तपास सुरू केला आणि बंगळुरूमध्ये एका संशयिताला अटक केली. पुढील तपासातून मुंबई आणि दिल्लीसह विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या व्यापक नेटवर्कचा पर्दाफाश झाला.

सायबर गुन्हे शाखेचे पोलिस अधीक्षक राहुल गुप्ता यांनी सांगितले की, नुलाक्सी भारतात अशा प्रकारच्या सायबर गुलामगिरी कॉल सेंटर्स सुरू करण्याच्या प्रयत्नात होता. त्याच्याकडे दुबई, चीन आणि कझाकस्तानचे रेसिडेन्सी कार्ड आहे. तसेच, त्याने एका बेकायदेशीर एजन्सीकडून जपान आणि दक्षिण कोरियाचे व्हिसा मिळवण्याचा प्रयत्न केला होता. भारतात सायबर फसवणुकीचे नेटवर्क विस्तारण्यासाठी तो व्यावसायिक जागा खरेदी करण्याच्या तयारीत होता, असे गुप्ता यांनी सांगितले.

तपासादरम्यान असे समोर आले

पान २ ▶

# म्यानमारमध्ये भूकंप; हजारो मृत्यूमुखी!

**▶ बँकॉक , थायलंडमध्येही हादरे, बचावकार्य सुरू**

**नेपीडॉ/बँकॉक, दि. २८ :**



म्यानमारमध्ये शुक्रवारी ७.७ तीव्रतेचा भूकंप झाला, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान आणि जीवितहानी होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. यूएस जिओलॉजिकल सर्व्हेनुसार, पहिल्या भूकंपानंतर अवघ्या १२ मिनिटांत ६.४ तीव्रतेचा दुसरा धक्का बसला. या भूकंपाचा केंद्रबिंदू सागाइंगपासून १८ किलोमीटर दक्षिणेला होता.

भूकंपाचा परिणाम शेजारील थायलंडमध्येही जाणवला. बँकॉकमध्ये एक बांधकाम सुरू असलेली इमारत कोसळली असून ४३ कामगार अद्याप ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. त्यांना वाचवण्यासाठी मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. म्यानमारच्या मंडाले शहरातील बचाव कर्मचाऱ्यांच्या माहितीनुसार, भूकंपामुळे मोठ्या प्रमाणावर नासधूस झाली असून मृतांचा आकडा हजारोंच्या घरात जाण्याची भीती आहे. राजधानी नेपीडॉमध्ये रस्त्यांना मोठ्या भेगा पडल्या असून इरावडी नदीवरील एक महत्त्वाचा पूल कोसळल्याचीही माहिती समोर आली आहे. यूएस जिओलॉजिकल सर्व्हे आणि जर्मनीच्या जीएफझेड सेंटर फॉर जिओसायन्सच्या अहवालानुसार, या भूकंपाचा केंद्रबिंदू पृथ्वीच्या १० किलोमीटर खोलीवर होता. चीनच्या सरकारी वृत्तसंस्थेने चायना अर्थक्वेक नेटवर्क सेंटरच्या हवाल्याने

भूकंपाची तीव्रता ७.९ इतकी असल्याचे सांगितले आहे. थायलंडच्या बँकॉक शहरातही भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. अनेक गगनचुंबी इमारती हलताना दिसल्या आणि काही इमारतींमधून नागरिकांना तातडीने बाहेर काढण्यात आले. एका

पान २ ▶

KALINGA INSTITUTE OF INDUSTRIAL TECHNOLOGY (KIIT)
Deemed to be University
(Established U/S 3 of UGC Act 1956), Bhubaneswar, Odisha, India

15th nirf — Among Indian Universities Ranked by NIRF, Govt. of India
A++ Grade — Accredited by NAAC
Tier 1 NBA — Re-accredited by NBA All Engineering Programs for 6 Years

KIITEE 2025
Apply Now
through KIIT Websites
www.kiitee.ac.in/www.kiit.ac.in
No Examination Fee (Computer-Based Test)

Special Consultative Status by the UN-ECOSOC
ABET (US) Accreditation
THE 601-800 University Ranking — World University Rankings 2024
IET Accredited Programme — The Institute of Engineering and Technology

ACADEMIC PROGRAMMES AVAILABLE

UG (3 years/4 years)/Integrated (5 years) Programmes [All 4 years Programmes are with Honors/Research]

B.Tech Programmes
- Civil
- Construction Technology
- Electrical
- Electrical & Computer Science
- Mechanical
- Mechanical (Automobile)
- Aerospace
- Mechatronics
- Electronics & Telecommunication
- Electronics & Computer Science
- Electronics & Electrical
- Electronics (VLSI Design & Technology)
- Chemical
- Computer Science & Engineering (CSE)
- CSE (Artificial Intelligence & Machine Learning)
- CSE (Artificial Intelligence)
- CSE (Cyber Security)
- CSE (Data Science)
- CSE (Internet of Things & Cyber Security including Block Chain Technology)
- CSE (Internet of Things)
- Information Technology
- Computer Science & System
- Computer Science & Communication

UG Programmes in other Disciplines
- B.Design (Automobile/ Graphic/Product)
- B.Design (Fashion / Textile)
- B.Tech & M.Tech Biotechnology (5yrs)
- B.Tech (Lateral Entry)
- B.Arch
- BCA
- BBA
- B.Sc (Hospitality & Tourism)
- Bachelor of Film & Television Production
- Bachelor of Communication & Journalism
- BA Economics
- BA Sociology
- BA English
- BA Psychology
- BA French
- BA Spanish
- BA Japanese
- BA German
- B.Com
- B.Sc (Economics & Data Analytics)
- B.Sc Computer Science
- B.Sc Nursing
- B.Pharma
- D.Pharma
- BA LLB/BBA LLB/B.Sc LLB (Hons) 5yrs

PG (1 year/2 years)/Integrated (5 years) Programmes
- M.Tech
- LLM (1yr)
- MCA
- M.Sc Biotechnology
- M.Sc Applied Microbiology
- M.Arch
- MBA
- MBA in Rural Management
- MBA in Agribusiness Management
- MBA-IEV (Innovation, Entrepreneurship and Venture Development)
- Master of Communication & Journalism
- Master in Urban & Regional Planning
- Master in Yoga & Naturopathy
- Master of Hospital Administration
- Master of Public Health
- M. Design (Interior)
- M.Sc Computer Science
- MA Economics
- MA Sociology
- MA English
- MA Psychology
- Master in Public Policy
- M.Com
- M.Sc Physics
- M.Sc Chemistry
- M.Sc Mathematics & Data Science
- Master in Library & Information Sciences
- Master in Physical Education & Sports
- M.Sc Nursing
- Integrated M.Tech & Ph.D
- Ph.D

CAMPUS PLACEMENT 2024 HIGHLIGHTS
700+ Companies
5585+ Job Offers
₹53 LPA Highest Salary Offered
₹8.50 LPA Average CTC
1500+ Paid Internships
1000+ Students with multiple job offers

Director, Admissions : Admission Cell, Koel Campus, Po- KIIT, Bhubaneswar-751024, Odisha, India, Ph: 8080 735 735, Fax : 0674 - 2741465, Email: admission@kiit.ac.in, Website: www.kiitee.ac.in

KIIT (Deemed to be University) has only one permanent campus in Bhubaneswar, Odisha. It has no other campus / off campus anywhere else in the country and globe.